# राशिभविष्य - सप्टेंबर, २०११.

**दादा दामले (dadadamle@hotmail.com )**

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात महिन्याचे पहिले दहा दिवस गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; आणि सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहून बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांच्या लेखन, संशोधन कार्यात प्रगती होईल. नंतर महिन्याच्या उत्तरार्धात षष्ठ स्थानी येणाऱ्या रवि-शनि व शुक्र यांमध्ये अशुभ योग घडत असल्याने असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. जपा. दिनांक ९ पासून मंगळ ग्रह या राशीच्या चतुर्थ स्थानी येईल व त्यामुळे कौटुंबिक व घरगुती वातावरणात व परिस्थितीत अशांतिकारक घटना घडतील. अशा काळात मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. या राशीच्या काहींना राहत्या जागेसंबंधी समस्येला तर काहींना स्थावरसंबंधी कटकटींना तोंड द्यावे लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरी-व्यवसायात अनपेक्षितपणे निर्माण होणाऱ्या प्रतिकुल घटनांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. व्यवसायात आर्थिक नुकसान व नोकरीत आर्थिक लाभात होणारे घोटाळे यांमुळे गहरे नैराश्य येणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात संततिविषयक समस्या, संततीचे आजार, नोकरीत वरिष्ठांची अवकृपा, स्वत:स अपघात वा संबंधितांपासून दुरावा अशापैकी घटनांनी अस्वस्थ व्हाल. शासकीय नोकरदार मंडळींना सहजगत्या वाममार्ग धन मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. अंगाशी येईल. जपा. काळ प्रतिकुल आहे हे मनात ठसवून शांत राहा. सहनशील व्हा. उगाच नव्या उलाढाली करू नका. त्यामुळेच प्रतिकुल काळ सुसह्य होईल. .दिनांक २६-२७ विशेष जपा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या पहिल्या सप्ताहात शारीरिक उष्णता भडकून उष्णतेच्या विकारांचा आजार होणे संभवते. यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते, वकिली, सल्लागारी, अकौंटन्सी व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण कोणत्याही प्रकारची नोकरी असो, वरिष्ठांशी मतभेद, वाद होणे शक्य दिसते. तसेच विरोधकांचा व छुप्या शत्रूंचाही त्रास होईल. जपा. अशा परिस्थितीत महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक जीवनात व घरगुती परिस्थितीत सुख, शांति-समाधान लाभेल. अध्यात्म, सामाजिक कार्य यांत रुचि असणारांना त्यांच्या कार्यात प्रगती होत असल्याचे दिसून येईल व त्यासाठी प्रवासयोगही येतील. मित्रांशी वाद, भांडणे होणे संभवते. जपा. कोणताही व्यापार-व्यवसाय करत असणारांना अस्थिर परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. पण मानसिक रोग तज्द्न्य, द्रव पदार्थांचे व्यापारी यांना मात्र काळ अनुकुल होईल.  तसेच ज्या व्यापाऱ्यांचा स्त्री-ग्राहकांशी संबंध असेल त्यांना काळ लाभदायक होईल. मुलांसंबंधीच्या समस्या वा त्याचे आजार यांमुळे संततिसुखात बाधा येणे शक्य आहे. अशाही परिस्थितीत बुध-शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व त्यामुळे प्रतिकुल काळ सुसह्य होईल.  श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून शारीरिक-मानसिक आरोग्यविघातक असल्याचाच अनुभव येईल. रवि ग्रह केवळ महिन्याच्या पूर्वार्धातच अनुकुल होणार असून मंगळाप्रमाणेच अनारोग्यकारक व मनस्ताप देणारा असाच असेल. पण शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व काळ सुसह्य होईल. बागाईत शेती व्यवसाय असणारांना व स्त्री-ग्राहकांशीच अधिक संबंध असणाऱ्या या राशीच्या व्यापाऱ्यांना काळ

अधिक प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या ज्या मंडळींचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असेल त्यांना अशा संबंधामुळेच अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईलसे दिसते. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना व शास्त्रीय विषयात संशोधन करत असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. अध्यात्मात विशेष रुचि असणारांना आध्यात्मिक उपासनेत प्रगती होत असल्याचा अनुभव येईल; व सात्विक सुखशांती लाभेल. काहींना सूचक स्वप्नेही पडतील. या राशीच्या काही भाग्यवंतांना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काल अनुकुल होईल; तसेच या राशीच्या मंडळींना अपेक्षित संततिसुख लाभेल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल असेल व पूर्वार्धातच त्यांनी जे काय साधावयाचे ते साधण्याचा प्रयत्न करावा. उत्तरार्धात अस्थिर परिस्थिती निर्माण होईल. दांपत्यजीवनात दोघांपैकी एकाचे अनारोग्य व दुसऱ्याचे स्वाभाविक दोष यांमुळेच सुखात बाधा येईल. जपा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींना मंगळ-बुध हे दोन ग्रह पूर्णपणे व रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धातच प्रतिकुल असणार आहे. त्यामुळे शारीरिक श्रम, दगदग होणार असून असह्य मनस्तापजनक घटनांना सामोरे जावे लागणार आहे. जपा. शारीरिक उष्णता भडकून डोळ्यांचे आरोग्य बिघडण्याची शक्यता दिसते. आर्थिक दृष्ट्या वाढता खर्च होणे, आर्थिक फ़सवणूक होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. काहींना कुसंगतीचा त्रास सहन करावा लागेल. पण गुरु-शुक्र या दोन्ही शुभ ग्रहांची अनुकुलता असल्याने मधून मधून अनुकुल व लाभदायक घटना घडतील. व त्या त्या वेळी कौटुंबिक सुखसमाधान मिळू शकेल. या राशीच्या काहींना उत्तम नोकरी तर काहींना नवे कार्यक्षेत्र मिळण्याची दाट शक्यता दिसते. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना, शिक्षणक्षेत्रात विद्यादानाचे पवित्र कार्य करत असणारांना व शास्त्रीय विषयातील संशोधनात्मक कार्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच वकिली-सल्लागारी, दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना काळ अनुकुल वा लाभदायक होईल. पण काही ना काही कारणाने संततिसुखात बाधा येणे संभवते.. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे येण्याची शक्यता आहे. या राशीच्या काहींना दूरच्या प्रवासाचे किंवा परदेशगमनाचे योग येतील. विषभय, जलभय आहे. जपा.

**(५) सिंह -** शनि ग्रहाच्या साडेसातीतील ही राशी आहे. या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींना शुभ ग्रह गुरु-शुक्र सोडून अन्य सर्व ग्रह प्रतिकुलच आहेत. त्यामुळे सध्या या राशीच्या मंडळींनी मन घट्ट करून व सहनशील बनूनच नम्रतेचे आचरण करावे हे उत्तम.

त्यामुळेच प्रतिकुलतेची शक्ती विरून जाईल व शुभ ग्रहांच्या अनुकुलतेचे सुखसमाधान लाभेल. "अरे ला कारे"कराल तर आग भडकणारच ! विनम्रतेचे आचरण केल्याने शारीरिक, मानसिक आरोग्य फ़ारसे बिघडणार नाही. शिवाय विरोधकांचा विरोधही बोथट होईल. आणि घडणारे विपरीतही बरेचसे टळेल. हट्टीपणा करू नका. अकारण श्रम, दगदग करू नका. विपरीत काळात 'आपलीही परकी होतात.' हे लक्षात ठेवून सावधानतेने व शांत मनाने प्रतिकुल काळाला सामोरे जा, शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने जे घडेल ते सुखाचेच असेल. या राशीच्या ज्या मंडळींना अध्यात्मात रुचि असेल त्यांनी श्रद्धापूर्वक हनुमानाची उपासना करावी. "हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करावे. अपघात भय असल्याने विचाराच्या तंद्रीत वाहन चालवू नका व सर्व आचरण सावधानतेनेच करा. मित्रमैत्रिणींशी

वितुष्ट येणार नाही, याची काळजी घ्या. आर्थिक व्यवहार विचारपूर्वकच करा. नोव्हेंबर १५ नंतर आपण शनि ग्रहाच्या साडेसातीतून मुक्त होत आहांत. पुढील काळ अनुकुल होणार असल्याने त्यासंबंधी प्रगतीच्या योजना आखून तयार राहा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींचा शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्याने त्यांनी मन व बुद्धी विकृत होणार नाही याची काळजी घ्यावी व सतत मनावर ताबा ठेवून व सहनशील बनूनच घरीदारी सर्व ठिकाणी नम्रतेने आचरण करावे. त्यामुळेच शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राहील व विपरीततेवर मात करणे शक्य होईल. राहू नोकरी-व्यवसायास अनुकुल असला तरी भावंडसंबंधात बाधा आणू शकेल. जीवनसाथीचे लहरी आचरण, मतभेद, वाद यांमुळे दांपत्यजीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी गैरसमजाने वा संशयाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या काही मंडळींना अकारण "आपल्याला कसला तरी आजार झाला असल्याची भावना" त्रस्त करील. किंवा काल्पनिक चिंतांचा त्रास सहन करावा लागेल. मित्रमैत्रिणींशी वितुष्ट येण्याची शक्यता आहे. जपा. नोकरी-व्यवसायात कामाचा ताण सहन करावा लागेल. शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व नव चैतन्य प्राप्त होईल. केतुमुळे संततिसुखात बाधा येणे शक्य आहे. या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग असतील त्यापैकी काहींना अचानक धनलाभ वा वारसाहक्काने धन मिळू शकेल.श्रद्धा असेल तर हनुमान उपासना करा; हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या अतिशय भावनाशील झाला असावा व मन अत्यंत हळवे झाले असावे, असे वाटते. त्यामुळे सध्या शनि ग्रहाच्या साडेसातीची भीती वाटत असेल तर भिण्याचे कारण नाही. कारण आपली राशी शनि ग्रहाची उच्च राशी आहे. त्यामुळे अन्य राशीच्या मंडळींना जो मनस्ताप सहन करावा लागतो तसा मनस्ताप या राशीच्या मंडळींना सहन करावा लागणार नाही. तरीही सांगावेसे वाटते की सर्व आर्थिक व्यवहार जपून करा. फ़सवणूक होणार नाही, याची काळजी घ्या. या राशीच्या नोकरी-व्यवसायात असलेल्या मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात शुभ ग्रह गुरु-शुक्र व काही प्रमाणात बुध सोडून इतर सर्व ग्रह प्रतिकुलच असणार आहेत. त्यामुळे श्रम, दगदग होणे, थकवा येणे, असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे, मनासारखे अपेक्षित असे न घडणे, नोकरी-व्यवसायात खळबळजनक घटना घडणे, मित्रमैत्रिणींत काही कारणाने वितुष्ट येणे, प्रवासात मनस्ताप सहन करावा लागणे, या सर्वांमुळे शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडणे शक्य आहे. म्हणून मन खंबीर ठेवा, जिभेला लगाम घाला, सहनशील व्हा. म्हणजे पुष्कळच विपरीत असे त्रास न होता वाहून जाईल व शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे ज्या मनोनुकुल घटना घडतील त्यांचे सुखसमाधान लाभू शकेल. श्रद्धा असेल तर हनुमान उपासना करा व हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या शासकीय, निमशासकीय नोकरीत असणाऱ्या मंडळींना, खाजगी नोकरीत असणारांना, सर्व कलाक्षेत्रातील मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. उच्च चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारांनाही संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व

लाभदायक होईल. पण संततिसुखाचे दृष्टीने मात्र काळ प्रतिकुलच होईल. महिन्याच्या प्रथम सप्ताहातच या राशीच्या काहीजणांना शारीरिक उष्णता भडकून उष्णतेच्या आजारांना तर काही जणांना वातविकारांना सामोरे जावे लागेल. पण या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या गुरुमुळे आजार आटोक्यात राहील. या महिन्याच्या काळात शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे घरातील प्रिय जनांच्या प्रेममय संबंधात गैरसमज, घोटाळे अशापैकी कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. दांपत्यजीवनात जीवनसाथीच्या अनारोग्यामुळेच वैवाहिक जीवनातील सुखात थोडी बाधा येण्याची शक्यता दिसते. या राशीच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासेतर गोष्टींचा फ़ाजील मोह टाळून मनापासून अध्ययन केले तरच ते अपेक्षित शैक्षणिक प्रगती करू शकतील.

अपघातभय आहे. जपा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रह नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने प्रतिकुल असेल. त्यामुळे कसले तरी भय, निराशा, मानहानी, मानसिक ताण, वरिष्ठांचा विरोध अशापैकी काहीही घडून असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हाच रवि अनुकुल होईल. असे असले तरी त्याच स्थानी शनि असल्यामुळे नोकरी-व्यवसायात काही क्रांतिकारक घटना घडण्याची शक्यता दिसते. दिनांक २६-२७ या दोन दिवशी चंद्रही याच स्थानी असल्याने अविस्मरणीय अनुभव येण्याची शक्यता दिसते. साहित्य-कला क्षेत्रातील मंडळींना या महिन्याचे पहिले दहा दिवसच अनुकुल व लाभदायक होतील. नंतरच्या काळात अनुकुलतेत अडचणी, अडथळे येण्याची शक्यता आहे. राहू-नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग संभवतात. याच नेपच्यूनमुळे मन अत्यंत भावनाशील होईल. अध्यात्म, गूढ संशोधन यांत रस असणारांना उपासनेद्वारे सात्विक सुखशांति लाभेल. मंगळ-हर्षल शारीरिक-मानसिक अनारोग्यकारकच असल्याचे सिद्ध होईल. तसेच ते दांपत्यजीवनात व कौटुंबिक जीवनात ताणतणाव निर्माण करण्याची शक्यता आहे. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णतेचे विकार त्रस्त करतील. अशा परिस्थितीत गुरु ग्रहाच्या संपूर्ण अनुकुलतेने फ़ारसे विपरीत घडणार नाही. या राशीच्या विद्यार्थ्यांनी मन व बुद्धी स्थिर व प्रसन्न राखून मनापासून अध्ययन केल्यास गुरुच्या अनुकुलतेने सहज उच्च प्रगती गाठणे शक्य होईल.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात या महिन्याचा उत्तरार्धच अधिक प्रतिकुल व मनस्तापदायक ठरेलसे दिसते. महिन्याचा पूर्वार्ध मनाविरुद्ध घटना घडून मनस्ताप होईल; तर घरातील सर्वांचेच आरोग्य बिघडण्याची शक्यता दिसते. अशाही परिस्थितीत बुध-शुक्राच्या अनुकुलतेने मनोनुकुल व लाभदायक घटना घडतील व मनबुद्धीवरील ताण सैल होईल. मंगळामुळे दांपत्यजीवनात जीवनसाथीचे अनारोग्य वा अन्य कटकटींमुळे वैताग येईल. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. राहू-केतुमुळे संततिविषयक समस्या त्रस्त करतील व या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होतील. तसेच राहूमुळे या राशीच्या मंडळींना सहज वाममार्ग धन मिळणे शक्य दिसते. पण तो मोह टाळा. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. त्याचप्रमाणे हा राहू जातकाला जुगाराच्या नादात अडकवतो. जपा.

गुरुच्या अबुकुलतेने कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल; पण अन्य संबंधितांकडून ग्रूहसौख्यात बाधा येणे संभवते. या राशीच्या धनस्थानी असलेल्या नेपच्यूननमुळे आर्थिक बाबतीत घोटाळे, विलंब, अडथळे निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जपा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींचे मन सध्या अतिशय कोमल व शीघ्र संवेदनाशील असे झाले असले पाहिजे. त्यामुळे थोडे जरी मनाविरुद्ध काही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असावे. पण स्वभाव मात्र अतिशय संतापी, अस्थिर व चंचल झाला असेल. त्यामुळे हातून विचित्र आचरण घडत असण्याची शक्यता आहे. शिवाय अशा मनस्थितीत अविचाराने खर्च होणे व अविचाराने फ़टकळ बोलणेही होत असण्याची दाट शक्यता वाटते. ही सारी हर्षल-नेपच्यूनची किमया आहे. हातून विपरीत असे काही घडू नये अशी तीव्र इच्छा असेल तर जिभेला लगाम घाला, मन व बुद्धी स्थिर ठेवा, स्वभावावर अंकुश ठेवा आणि अत्यंत संयमाने व सहनशीलतेने आचरण करा. त्यामुळे सर्व काही सुखाचेच होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना विविध प्रकारचे लाभ देणारा काळ आहे. वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व प्रगतिशील होईल. साहित्य, वृत्तपत्र, मासिक यांतील लेखकवर्गास व ग्रंथकारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. मंगळ अनारोग्यकारकच असेल. उष्णताविकार, रक्तविकार, त्वचाविकार अशापैकी आजार होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला शनि सर्व प्रकारचे आरोग्य बिघडण्यास कारणीभूत होईल. महिन्याच्या पूर्वार्धात दांपत्यजीवनात मतभेद, वाद होतील. महिन्याच्या उत्तरार्धात अधिक मनाविरुद्ध घटना घडतील. कोणाशीही पटणार नाही. जपा. बुध-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व विविध प्रकारचे लाभही होतील.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या अतिशय चंचल, लहरी व कोणाचाही हितोपदेश वा सल्ला न ऐकण्याच्या मनस्थितीत असणारा असा झाला असला पाहिजे. कसलाही धाक वा दडपण सहन होत नसावे. या राशीची लहान मुले तर अतिशय व्रात्य व हूड अशा आचरणाचीच असतील. याउलट या राशीच्या मंडळींचे मन मात्र अतिशय कोमल, शीघ्र संवेदनाशील असे घडले असावे. त्यामुळे थोडेही मनाविरुद्ध घडले तर लगेच गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. रवि-बुध-शुक्र महिन्याच्या पूर्वार्धात नोकरी=व्यवसायाच्या दृष्टीने अनुकुल व पूरक असे असतील; तर उत्तरार्धात दाम्पत्यजीवनातील सुखाचे दृष्टीने प्रतिकुल होतील. त्यामुळे पतिपत्नीत वाद, भांडणे होणे शक्य आहे. तसेच जीवनसाथीचे व मुलांचे आजार त्रस्त करतील. राहू व मंगळामुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य यांत बाधा निर्माण होईल व संततिसुखाचे दृष्टीनेही राहू-मंगळ तापदायकच होतील. या राशीच्या धनस्थानी असलेल्या गुरुमुळे कुटुंबात शुभ घटना घडतील. नोकरीत लाभ होतील व या राशीच्या व्यापार-व्यवसाय करत असणाऱ्या मंडळींना प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक लाभ होईल..श्रद्धा असेल तर या राशीच्या मंडळींनी मन:शांतिसाठी आध्यात्मिक उपासना करावी."बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करावे.

=====00000=====